# रेशीम शेतीमध्ये सखोल संशोधनाची गरज : डॉ. शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

रेशीम शेती हा एक शेतीपूरक चांगला व्यवसाय असून, त्यामध्ये संशोधनाची कमतरता आहे. भविष्यात या विषयात सखोल संशोधन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स सोलापूरचे डॉ. किशोर शिंदे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमध्ये प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने 'रेशीम शेती, संशोधन व रोजगार संधी' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. डॉ. शिंदे रेशीम किडयांचे प्रकार, त्यांच्या वाढीसाठी लागणाऱ्या वनस्पती, रेशीम किड्यांचे जीवनचक्र याबद्दल महत्त्वपूर्ण माहिती दिली.

कार्यक्रमाचे नियोजन प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले होते. डॉ. टी. सी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. टी. सी. गौपाले यांनी आभार मानले.

# विवेकानंद कॉलेजमध्ये रेशीम शेती, संशोधन व रोजगार संधी विषयावर व्याख्यान संपन्न



**कोल्हापूर:** येथील विवेकानंद कॉलेजमध्ये प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने रेशीम शेती, संशोधन व रोजगार संधी या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. यासाठी वक्ते म्हणून वालचंद कॉलेज ऑफ आर्टस, अँण्ड सायन्स सोलापूरचे सहायक प्राध्यापक डॉ. किशोर शिंदे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

प्रमुख वक्ते डॉ. किशोर शिंदे आपल्या व्याख्यानात रेशीम किड्यांचे प्रकार, त्यांच्या वाढीसाठी लागणाऱ्या वनस्पती, रेशीम किड्यांचे जीवनचक्र याबद्दल महत्वपूर्ण माहिती दिली. तसेच त्यांनी रेशीम शेतीतून लोकांना उपलब्ध होणाऱ्या नोकरी व व्यवसायाच्या संधी, रेशीम शेतीसाठीच्या विविध सरकारी योजना व त्यातून मिळणारे अनुदान याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रेशीम शेती हा एक शेतीपूरक चांगला व्यवसाय म्हणून त्याकडे बघत असतानाच त्यातील संशोधनाची असणारी कमतरता याविषयी त्यांनी खंत व्यक्त केली आणि भविष्यकाळात याविषयी सखोल संशोधन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे नियोजन प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले. आभार डॉ. टी. सी. गौपाले यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. टी. सी. पाटील यांनी केले. यासाठी विभागातील सर्व सहाय्यक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. यावेळी प्राध्यापक व बी.एस्सी. चे विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

पुण्यनगरी दि. 23/08/23

## 'विवेकानंद'मध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिन

**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त 'युवक-युवती यांची जबाबदारी' या विषयावर विवेकानंद कॉलेजमध्ये प्राणिशास्त्र विभागातर्फे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून निर्भया पथकाच्या सपोनि मेघा पाटील, पोलीस उपनिरीक्षक गीता पाटील, सीपीआरमधील समुपदेशक मकरंद चौधरी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. प्रास्ताविक डॉ. टी. सी. गौपाले यांनी केले. डॉ. एस. एस. देसाई यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले. सूत्रसंचालन एन. ए. पटेल व के. के. लोखंडे यांनी केले.

त. भारत दि. 23/08/2023

## विवेकानंदमध्ये युवा दिन साजरा

**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित युवक-युवती यांची जबाबदारी या विषयावर विवेकानंद कॉलेजमध्ये प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कोल्हापूर निर्भया पथक सहाय्यक पोलीस निरीक्षक मेघा पाटील, करवीर निर्भया पथक पोलीस उपनिरीक्षक गीता पाटील, सी.पी.आर. समुपदेशक मकरंद चौधरी यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. प्रास्ताविक डॉ. टी. सी. गौपाले यांनी केले. डॉ. एस. एस. देसाई यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले. सुत्रसंचालन एन. ए. पटेल व के. के. लोखंडे यांनी केले. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी दि. 23/08/2023

## 'विवेकानंद'मध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये प्राणीशास्त्र विभागाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित युवक- युवतींची जबाबदारी या विषयावर व्याख्यान घेतले होते. निर्भया पथकाच्या सहायक पोलिस निरीक्षक मेघा पाटील, पोलिस उपनिरीक्षक गीता पाटील, सीपीआरचे समुपदेशक मकरंद चौधरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. मेघा पाटील यांनी सोशल मीडियाचे तोटे व दुरुपयोग तसेच विविध कलमांबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. डॉ. टी. सी. गौपाले यांनी प्रास्ताविक केले. एन. ए. पटेल, के. के. लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. एस. देसाई यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले.

# विवेकानंद कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय युवादिन साजरा



**कोल्हापूर** : आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित 'युवक युवती यांची जबाबदारी' या विषयावर विवेकानंद कॉलेजमध्ये प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक, निर्भया पथकच्या सौ. मेघा पाटील, पोलीस उपनिरीक्षक, निर्भया पथक, करवीरच्या सौ. गीता पाटील व सीपीआर हॉस्पीटलचे समुपदेशक मकरंद पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

प्रमुख पाहुण्या सौ. मेघा पाटील यांनी सोशल मिडियाचे तोटे आणि दुरुपयोग तसेच विविध कलमांबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. सौ गीता पाटील यांनी युवकांचे समाजामध्ये वावरताना वर्तन, विचार आणि आचरण कसे असावे याबद्दल मार्गदर्शन केले. मकरंद चौधरी यांनी युवा पिढीच्या हितासाठी या विषयावर समुपदेशन केले.

प्रास्ताविक डॉ. टी. सी. गौपाले यांनी केले. डॉ. एस. एस. देसाई यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे नियोजन प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले. सुत्रसंचालन एन. ए. पटेल व के. के. लोखंडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व बी.एस्सी. व एम.एस्सी. मधील विद्यार्थी उपस्थित होते.

# वन्यजीव सप्ताहानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

कोल्हापूर : वन्यजीव हे जैवविविधतेचे अविभाज्य घटक असून त्यांचे मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. नामशेष होत चाललेल्या वन्य पशुपक्ष्यांबाबत जागृती निर्माण करण्यासाठी विवेकानंद कॉलेजच्या प्राणीशास्त्र विभागांतर्गत १ ते ७ ऑक्टोबर दरम्यान भारतीय वन्यजीव सप्ताह साजरा केला जात आहे. वन्यजीव संरक्षणासाठी भागीदारी हा यंदाचा विषय आहे. या सप्ताहामध्ये रांगोळी, फोटोग्राफी, क्राफ्ट एड मॉडेल, पोस्टर्स, निबंध, वक्तृत्व, शॉर्टफिल्म, प्रश्नमंजुषा, हॅण्ड एड फेस पेंटींग या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बी.एस्सी. भाग १ ते ३ च्या विद्यार्थ्यांनी वन्यजीव संरक्षण आणि संवर्धन या विषयावर पथनाट्य सादर केले.

कार्यक्रमाचे नियोजन प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. टी. सी. पाटील यांनी केले. आभार डॉ. टी. सी. गौपाले यांनी मानले. यावेळी विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

